# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)
एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.
दूरध्वनी : ०२२ - ६२४९ ११११ / ११२
ईमेल : admin@siddhivinayak.org I info@siddhivinayak.org
वेबसाईट : www.siddhivinayak.org

श्री सिध्दिविनायक

## प्रथम मुदतवाढ
## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात पावसाळी कारपेट पुरवठा करण्याबाबत.**
**कालावधी**
**सन २०२६ – २०२७ वर्षभराकरिता**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात वर्षभराकरिता पावसाळी कारपेट पुरवठा करण्याकरीता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून विहित पध्दतीने मोहरबंद दरपत्रके मागविण्यात आले होते त्यात एकही निविदाकाराने सहभाग न घेतल्याने प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : | शुक्रवार, दि.२०.०३.२०२६ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | गुरूवार, दि.०९.०४.२०२६,सांय. ५ वाजेपर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | शुक्रवार, दि.१०.०४.२०२६, दु. २ वाजता |

अटी व शर्ती :

१) मूळ दरपत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification) वर्षभराकरिता पावसाळी कारपेट खरेदी करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) आपण देत असलेल्या वर्षभराकरिता पावसाळी कारपेटचा दर्जा उत्तम असावा. तसेच स्वत:चे दुकान असावे.

३) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून ५० किमी अंतरावर असणे आवश्यक आहे.

४) वर्षभराकरिता पावसाळी कारपेट न्यासाच्या खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करावयाचा आहे. साहित्यांच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

५) सदर वर्षभराकरिता पावसाळी कारपेटचा कार्यादेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसात पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील. पुरवठा वेळेत न केल्यास किंवा पावसाळी कारपेट मध्ये तफावत आढळल्यास किंवा सदोष पावसाळी कारपेट पुरवठा केल्यास पुरवठादाराच्या देयकातून २०% रक्कम कपात करण्यात येईल. पुरवठाचे काम पूर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलामध्ये पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बॅंकेचा तपशील नमूद करणे.

६) सदर दरपत्रकधारक हा हिंदु असावा.

७) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षाकिंत करून सादर करावयाची कागदपत्रे :

लिफाफा क्र.१ – अ) कंपनी नोंदणीचा दाखला / ट्रेडिंग लायसन्स

ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी

क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

ड) मागील ३ वर्षाची सरासरी उलाढाल किमान ५ लक्ष असावी.

इ) ३ वर्षाचा अनुभव दर्शवणारी कागदपत्रे

लिफाफा क्र.२ – अ) मूल्य दरपत्रक

८) दरपत्रकधारकाने A ४ साईज लिफाफा मध्ये तांत्रिक दरपत्रक व मुल्य दरपत्रक तपशिल याप्रमाणे दोन वेगवेगळया लिफाफामध्ये भरुन त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक त्यावर लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

९) दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्विकृत दर अखेर पर्यंत कायम राहतील. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

१०) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

११) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१२) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१३) पावसाळी कारपेट संबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९११६० वर संपर्क साधावा.

१४) पावसाळी कारपेट पुरवठा कालावधी समाप्त झाल्यास, पुढील मोहरबंद दरपत्रके किंवा याबाबतची ई–निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पावसाळी कारपेट पुरवठा दरपत्रकान्वये सादर केलेल्या दरानुसार न्यासास करणे आवश्यक राहिल.

१५) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

(वीणा पाटील)

कार्यकारी अधिकारी